# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV | NOVEMBER 2022 | No. 10


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : ७७:१-११

१) मी आपल्या वाणीनें देवाला हाक मारीन; मी देवाला हाक मारीन व तो माझे ऐकेल.

२) माझ्या संकटाच्या दिवशी मी प्रभूला शरण गेलो; रात्री माझा हात पसरलेला राहिला, तो ढिला पडला नाही; माझा जीव सांत्वन पावेना.

३) मी देवाचें स्मरण करून व्याकुळ होतो; मी ध्यान करुं इच्छितों पण माझा जीव मूर्च्छित होतो.

४) तू माझ्या पापणीस पापणी लागूं देत नाहीस; मी विव्हश झालो आहे, मला बोलवत नाही.

५) पूर्वीचे दिवस व प्राचीन काळची वर्षे ही मी ध्यानांत आणिली आहेत.

६) रात्री मला आपल्या गीतांचें स्मरण होते; मी आपल्या मनांत चिंतन करितो. माझा जीव विचारांत पडला आहे की

७) प्रभु सर्वकाळ आमचा त्याग करील काय? तो पुन: कधी प्रसन्न होणार नाही काय?

८) त्याची दया कायमची नाहीशी झाली काय? त्याचें अभिवचन पिढ्यानुपिढ्या निष्फळ राहणार काय?

९) देव कृपा करावयाचें विसरला काय? त्याने क्रोधामुळें आपला कळवळा आवरुन धरिला काय?

१०) मी म्हणालो, ही तर केवळ माझी दुर्बलता आहे; परंतु मी परात्पराच उजव्या हातच्या वर्षांचें स्मरण करीन.

११) मी परमेशाची महत्कृत्यें वर्णीन; आणि मी पुरातन कालच्या अद्भुत कृत्यांचें स्मरण करीन.

# प्रभु तुम्हाला देखील आशीर्वाद देईल!

## THE LORD WILL BLESS YOU ALSO!

**"तुझे साहाय्य करणारा तुझ्या पित्याचा देव, तुला वरदान देणारा सर्वसमर्थ देव याजकडून हे होईल, वरुन आकाशाची व खालून जलाशयाची वरदाने तुला तो देईल, दुधाची व संततीची वरदाने तो तुला देईल."**

**(उत्पति ४९:२५)**



*हा संदेश पास्टर एस्. अब्राहाम यांनी एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याच्या ५४व्या वर्धापन दिन सोहळ्यात दिला.*

उत्पति ४९व्या अध्यायात, देवाने आपला पूर्वज याकोब याने मृत्युपुर्वी त्याच्या १२ पुत्रांना प्रत्येकला दिलेला आशीर्वाद प्रकट केलेला आहे.

'योसेफ' या नावाचा अर्थ गुणाकार. उत्पति ४९:२५ या वचनाच्या अगोदर येसेफास दिलेला आशीर्वाद आहे. या आशीर्वादात आपल्याला चार प्रकारचे आशीर्वाद पहावयास मिळतात :-

१) स्वर्गाकडून आशीर्वाद

२) भूगर्भातून प्राप्त होणारे आशीर्वाद

३) आपल्या लेकरांना दूध पाजणाऱ्या आईच्या संबंधातील आशीर्वाद

४) बाळाला जन्म देताना तीव्र वेदना अनुभवणाऱ्या तरी देखील अनेक पिढ्यांना जन्म देऊ शकणाऱ्या उदराशी संबंधीत आशीर्वाद

### १) स्वर्गीय आशीर्वाद !

स्वर्गातून प्राप्त होणारे आशीर्वाद हे उत्कृष्ठ असतात. देवाच्या प्रत्येक लेकराने ते स्वीकारले पाहिजेत. आपला पूर्वज इसहाक याने त्याच्या पुत्राला आशीर्वाद देत असताना सर्व प्रथम स्वर्गीय आशीर्वाद दिले. **"देव तुला आकाशाचे दहिवर, पृथ्वीवरील सुपीक जमिनी आणि विपुल धान्य व द्राक्षारस देवो."** (उत्पति २७:२८). या आशीर्वादानुसार, प्रभु परमेश्वराने याकोबाला, इसहाकाने जे काही आशीर्वाद दिले ते देखील मिळाल. **"प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली."** अशा रितीने बायबल निर्देशीत करते कि प्रथम 'आकाश' उत्पन्न केले गेले. देवाने आकाशाला अतिशय महत्व दिले. अब्राहामाने, देवाने त्याला दिलेल्या अभिवचनावर संशय

(...पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

(ECHO GROUP)





### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858



**CORE LEADERS**
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah



**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


## "परमेश्वर तुजकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांति देवो''''

(गणना ६:२६)

ख्रिस्त येशूमधील प्रिय मित्रांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या आश्चर्यकारी नामात प्रेमळ शुभेच्छा व्यक्त करीत आहोत.

देवाच्या विपुल दये द्वारे २०२२ या वर्षाचा शेवट वेगाने जवळ येत आहे. जगांतील लोक येशू ख्रिस्ताच्या जन्मदिन आणि २०२३ची पहाट साजरी करण्याची उत्कंठतेने वाट पहात तयारी करीत आहेत. आपण आध्यात्मिक लोक असल्यामुळे या दिवसांचा गांभिऱ्याने आध्यात्मिक मार्गांनी उपयोग केला पाहिजे. आपण स्वत:स आग्रहाने प्रार्थना करण्यात आणि देवाच्या खऱ्या सेवाकार्यात सहभागी व्हावे.

प्रार्थना आणि सेवाकार्य या नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपणास पुष्कळ लोक देवाच्या सेवाकार्यात व्यस्त असलेले पहावयास मिळतात परंतु ते त्यांचा प्रार्थनेचे वेळापत्रक टाळतात, त्याकडे दुर्लक्ष करितात. याचा परिणाम आत्मिक थकवा आणि पतन यात होतो.

आज सकाळीदेवाने मला जे विचार सुचविले ते थोडक्यात लिहून तुम्हाला कळवित आहे.

लोकांबरोबरील सहभागितेत काही वेळा कडू भावना अनुभवण्यास मिळतात. आपण परिपूर्ण असे लोक जरी नाही तरी प्रतिदिनी पूर्ण ते मध्ये बदलले जात आहोत. आपण पवित्र आत्म्याला मोकळीक दिली तर देव आपणाला शुद्ध करण्यास आणि आपणात बद्दल घडविण्यास लोकांचा उपयोग करून घेतो. परंतु जे लोक नित्यनेमाने नेहमी प्रार्थना करीत असतात ते क्रोधाला किंवा शंका यांना स्थान देणार नाहीत.

कुरबुर आणि भांडाभांडीची उपस्थिती प्रार्थनेच्या अनुपस्थितीमुळे होते. प्रार्थनारहित व्यक्ति ही ज्यासाठी संघर्ष किंवा पतनाचा स्त्रोत असते. पौलाला सहभागितेमध्ये उत्पन्न होऊ शकणाऱ्या आवाहनांची आणि अडचणींची पूर्ण कल्पना असल्यामुळे, त्याने नियमावली सोपविली. सुरवातीच्या मंडळीमध्ये प्रेषित प्रार्थनेला कमी वेळ देवून समस्या हाताळीत होते, तेव्हा त्यांना मंडळीत अडचण, असमाधान आणि संघर्ष उत्पन्न होत असलेला पहावयास मिळाला. त्यांनी जेव्हा प्रार्थनेकरीता आवश्यक ती व्यवस्था केली, तेव्हा पुनः सहभागीत गोडी निर्माण झाली. (प्रे.कृ. ६:४)



आमच्या चेन्नाईमधील सेवेतील प्रमुख पुढारी


Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

प्रार्थनेत कसूर होते जी टाळली जाते तेव्हा पावित्रतेत अपयश येते. डोळ्यांची वासना, शरिराची वासना आणि संसारीची फूशारकी सर्व प्रकारच्या पापाचा प्रवेश होतो आणि वैयक्तिक तारणास अ=ाणि विस्तृतपणे ख्रिस्ताच्या शरिरास बाधा पोंहचते. समाधान नसते. तक्रार, कुरकुर, दोष शोधणे आणि धिक्कार उत्पन्न होतात. ही प्रार्थनारहित जीवनाची कडू फळे आहेत. शंका-संशय यातनामय शेवटास मार्ग मोकळा करतो. या सर्व गोष्टि लोक प्रार्थना करण्यात अपयशी ठरतात तेव्हा घडतात. प्रार्थना न करण्यामुळे सहभागीता अपयशी ठरते. प्रार्थना हे जीवनाकरिता आवश्यक असे रक्त आहे जे अत्मिक फळ उपजविते.

आमच्या सेवेतील प्रमुख पुढाऱ्यांना प्रार्थना आणि सहभागीतेसाठी अम्ही १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजल्या पासून चेन्नाईमध्ये एकति आणले, तो कार्याक्रम देवाने आशीर्वादीत केला. बंधुंनो आम्हांकरिता प्रार्थना करा.

देव तुम्हांस आशीर्वाद देवो.


**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**
**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

व्यक्त केला, तेव्हा देवाने त्याला बाहेर नेले व वर आकाशाकडे पहावयास लाविले.



**''मग त्यानें त्याला बाहेर आणून म्हटले, आकाशाकडे दृष्टि लाव; तुला हे तारे मोजवतील तर मोज; इतकी तुझी संतति होईल असे त्याने त्याला सांगितले.''** (उत्पति १५:५). या जगीक जीवनात आपण थकून जातो, अशा वेळी देव स्वर्गिय आशीर्वादाकडे आपले लक्ष निर्देशीत करीत असल्यामुळे आपल्या दु:खांचे आनंदात रुपांतर होते. एक छोटा मुलगा येशूकडे आला. त्याच्याकडे पांच भाकरी व दोन मासे होते. ते अन्न जेव्हा प्रभु येशू ख्रिस्ताच्या हातात आले, पांच हजारांपेक्षा अधिक लोकांची भूक शमविली गेली. या छोट्या मुलाच्या अन्नाद्वारे इतक्या



मोठ्या संख्येतील भूकेल्या लोकांना अन्न कसे पुरविले गेले? येशू ख्रिस्ताने ते अन्न वर आकाशाकडे उंचावले आणि स्वर्गातून आशीर्वाद प्राप्त करून घेतल्यामुळे घडले नाहि कां?

येशू ख्रिस्ताला त्याच्या सेवेच्या काळात वर आकाशाकडे दृष्टि लावण्याची सवय होती. आकाशातील आशीर्वाद देवाचे वस्तीस्थानातून असलेल्या स्वर्गातून सामर्थ्य खाली आणते. केवळ स्वर्गीय आशीर्वादाच्या श्रेष्ठत्वामुळे, जे अन्न त्या छोट्या मुलापुरते पुरेसे होते, ते इतके शक्तिशाली बनले, कि ज्यामुळे हजारो लोकांची भुक शमविली गेली.

स्वर्गीय वैभवासंबंधीत आणखीन एक उदाहरण पाहू या. एकदा एका मुक्या-बहिऱ्या इसमास येशूकडे आणण्यात आले. मार्क ७:३३-३४ या वचनात आपणास वाचावयास मिळते, **''तेव्हा त्यानें त्याला लोकसमुदायापासून एकीकडे नेऊन त्याच्या कानांत बोटे घातली व थुंकून त्याच्या जिभेला स्पर्श केला; आणि वर स्वर्गाकडे पाहून त्यानें उसासा टाकिला व म्हटले, इप्फाता, म्हणजे मोकळा हो.''** लाजार आजारी झाला, तेव्हा त्यांनी त्याला बरे करण्याकरिता येशूला निरोप पाठविला. परंतु येशू ख्रिस्त लाजारला तो आजारी होता त्यावेळेस त्याला भेटण्यास किंवा तो मृत्यु पावल्यानंतरही आला नाही; तर तो मेल्या नंतर चार दिवसानंतर त्या ठिकाणी तो आला. लाजार जरी येशू ख्रिस्ताचा प्रिय मित्र होता, तो त्याच्या कबरेजवळ त्याच्या शवास दुर्गंधि येत असताना आला. (योहान ११:३९). बायबल योहान ११:४१-४२ या वचनात असे म्हणते... ''येशूने दृष्टि वर करून म्हटले, हे पित्या, तूं माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानितों मला माहित आहे, तूं सर्वदा माझ ऐकतोस...'' अशा रितीने स्वर्गातून आशीर्वाद **आणि सामर्थ्य प्राप्त केल्यानंतर त्याने मोठ्याने हांक मारून म्हटले, लाजरा, बाहेर ये.''** योहान ११:४३ तेव्हा चार दिवस मृत अवस्थेत शरिराला दुर्गंधी येत असलेला असा जिवंत बाहेर आला. समस्या किती मोठी आहे. हि येशू ख्रिस्तासाठी समस्या नाहि. तो सर्व सामर्थी आणि सर्व शक्तिमान देव असल्यामुळे कोणत्याहि समस्यांपेक्षा मोठा आहे. स्वर्गीय आशीर्वाद जे प्रभु परमेश्वराची शक्ति खाली आणते ती कोणत्याहि समस्येपेक्षा मोठी आहे. शिवाय ते विश्वासणाऱ्याला देव राज्य देवू करते. **इस्राएल लोक रफिदीम येथे असताना, ते पिण्याच्या पाण्यासाठी - मोशेशी भांडू लागले, तेव्हा मोशानें परमेश्वराचा धावा केला.** (निर्गम १७:१-४). त्या निर्जन स्थळी, स्वर्गीय आशीर्वाद अद्भूत रितीने खाली उतरुन आले **आणि खडकामधून पाणी बाहेर आले.** (निर्गम १७:५-६).

जावयास निघाला, तेंव्हा रात्री निर्वासीत भटक्याप्रमाणे एके ठिकाणी राहिला. तेथे झोपण्यासाठी खाट आणि डोक्यासाठी उशी नव्हती. डोक्याखाली उशी म्हणून दगडाचा उपयोग केला. भविष्याबद्दल त्याला ठाऊक नव्हते. जीवनाबद्दलच्या ज्ञानाबद्दल त्याची सुरवात होती आणि मनात तणाव होता. अशा स्थितीत त्याला स्वप्न पडले... **''एक शिडी पृथ्वीवर उभी केली असून तिचा शेंडा आकाशास लागला आहे; आणि तीवरुन देवदूत चढत-उतरत**

**आहे. आणि पाहा परमेश्वर त्याच्या पाशी उभा...''** (उत्पति २८:१२-१३)

देवाच्या एका सेवकाने त्याच्या जवळील सर्व बचतीमधून आणि लोकांनी दिलेल्या स्वेच्छा दानामधून ५००० लोक बसू शकतील इतकी मोठे प्रार्थना मंदिर बांधले. कांही महिन्यांच्या अवधीतच अनेक अडचणींचा सामनाकरून बांधिलेल्या मंदिराला वादळाचा तडाखा बसला आणि मंदिर कोसळले. त्या स्थितीत अत्यंत दुःखात आणि यातनात असताना देखील त्याने देवाची स्तुति केली. तेव्हा लोक त्याला उपहास करु लागले. अशा कठीण अवस्थेत असताना काही लोक त्याजकडे आले आणि त्याला विचारीले, ''तुम्ही आमच्या मंडळीत येऊन संदेश द्याल कां?'' आपल्याला सांत्वन मिळेल अशा विचराने त्याने होकार दिला. अनेक महिने त्याने त्या मंडळीत वचनाची सेवा केली. तो जेथे संदेश देत होता, त्या ठिकाणी उपस्थित येणाऱ्यांना देवाचे वैभव - तेव्हा अनुभवण्यास मिळू लागले; अनेक जण नियमितपणे उपासनेस हजर राहू लागले. अनेकांना नवीन जीवन प्राप्त झाले. संख्या वाढू लागली आणि जवळ-जवळ दोन लाख लोकांची उपस्थिती होऊ लागली. अशा वेळी त्याला देवाची वाणी स्पष्ट ऐकू आली, ''मला तू केवळ ५००० साठी नाहि तर लाखो लोकांकरिता हवा होतास, म्हणून मी तुझे मंदिर पाडून टाकले.''

देवाने पक्षाचे घरटे उध्वस्त केले अशासाठी कि पिल्लांनी उडण्यास व स्वतः अन्नाचा शोध घेण्यास शिकावे. याकोबाने स्वप्नात कोणती शीडी पाहिली? शिडीच्या वरच्या भागावर त्याने देवास पाहिले. शिडीबद्दल शिकण्यासाठी, आपण - योहान १:५१ या वचनाकडे वळू या. ''**आणखी तो त्याला म्हणाला, मी तुम्हांस खचीत सांगतो, आकाश उघडलेले आणि देवदूतांस चढताना व मनुष्याच्या पुत्रावर उतरताना तुम्ही पहाल.**'' शिडी प्रत्यक्षात येशू ख्रिस्त आहे. येशू ख्रिस्त हि शिडी आहे जिच्या द्वारे तुमच्या प्रार्थना देव पित्याकडे नेल्या जातात, आणि त्याची उत्तरे खाली आणली जातात. ''**त्याचे डोके व केस ही पांढऱ्या लोकरीसारखी, बर्फासारखी पांढरी होती, त्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे होते... त्याच्या उजव्या हातात सात तारे होते...''** (प्रकटी १:१४-१६). येशू ख्रिस्त ज्याचा चेहरा प्रखर सुर्य तेजासारखा होता, तो आपल्याकरिता शिडीसारखा होता आणि तो सदोदित आपल्या संगती राहून आपल्याला कदापी न त्यागता संरक्षण करीतो ईयोब - ९:११ या वचनात आपण वाचतो - ''**पाहा, तो माझ्या जवळून जातो तरी मला दिसत नाही.**'' तो जेव्हा आपल्या सोबत असतो; आपणांस आशीर्वाद देण्यास तयार असतो, मात्र आपण ते समजण्यास चुकतो.

## २) पृथ्वीचे आशीर्वाद !

आपण जेव्हा स्वर्गीय आशीर्वाद प्राप्त करतो, तो त्या सोबत पृथ्वीचे आशीर्वाद देखील देत असतो. पृथ्वीचे आशीर्वाद



अतिशय महत्त्वाचे आहेत. ''**परमेश्वराने मोशाबरोबर सीनाय पर्वतावर हे सर्व भाषण केल्यानंतर आपल्या बोटाने लिहिलेले पाषाणाचे दोन आज्ञापट त्याला दिले.**'' (निर्गम ३१:१८) मोशाने त्याला स्वर्गीय आशीर्वाद प्राप्त झाल्यानंतर, सिनाय पर्वतावरुन पाषाणावर देवाने लिहिलेले आज्ञापट खाली आणले. हे पृथ्वीवरील आशीर्वाद लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी, लोकांचे नेतृत्व करण्यासाठी, आणि कुटुंबाच्या आधारासाठी आवश्यक होते. मोशेला पर्वतावरुन खाली येण्यास विलंब लागल्यामुळे, इस्त्राएल लोकांनी अहरोनास एक वासरु घडविण्यास भाग पाडले आणि त्याची पुजा करु लागले. हे पाहून मोशे क्रोधीत झाला आणि त्याने दगडी पाट्याखाली टाकून फोडल्या. आपणाला स्वर्गीय आणि आत्मिक अशीर्वादाची देखील गरज आहे. हा आशीर्वाद आपले दुःख, मानसिक ताण आणि क्लेश दूर करील. हा आपल्याला जगीक आशीर्वाद प्राप्त करण्यास मदत करतो. हा देखील आशीर्वाद देवापासून

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

**सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान**

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल
डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

**योग्यता 10 वी या अधिक**
**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✶ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ✶

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ नोव्हेंबर २०२२ ते १८ डिसेंबर २०२२ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ नोव्हेंबर** : टपाला द्वारे करण्यात येत असलेल्या बायबलकोअर आणि थियॉलॉजीकल अभ्यास क्रमात झालेल्या वाढीबद्दल.

**२० नोव्हेंबर** : आमचे प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्या सर्वांच्या कुटुंबांबद्दल.

**२१ नोव्हेंबर** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये आमचे मासिक छापून, प्रसिद्ध करुन ते मिशन क्षेत्रांमध्ये पाठविणे शक्य होऊ दिल्याबद्दल.

**२२ नोव्हेंबर** : ऑक्टोंबर महिन्यांतील सर्व गरजा पुरविल्या बद्दल.

**२३ नोव्हेंबर** : आमच्या हॉस्पीटल सेवेतील देवाच्या चमत्कारांबद्दल.

**२४ नोव्हेंबर** : आमच्या मुख्य मंडळी, शाखा मंडळ्या आणि यातील सर्व विश्वासणाऱ्या बद्दल.

**२५ नोव्हेंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कुल**च्या प्रिन्सिपल, सर्व शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांबद्दल

**२६ नोव्हेंबर** : आमचे वरिष्ठ पाळकांबद्दल आणि आमच्या विविध सेवाद्वारे सुवार्ता गाजविण्याच्या त्यांच्या समपितपणा बद्दल.

**२७ नोव्हेंबर** : नविन विश्वासणाऱ्यांची मंडळीत भर घातल्या बद्दल.

**२८ नोव्हेंबर** : संस्थेला नविन कर्मचारी देऊन आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२९ नोव्हेंबर** : १२ सप्टेंबर रोजीची सर्व पुढाऱ्यांची सहभागीता आशीर्वादीत केल्या बद्दल.

**३० नोव्हेंबर** : ३० सप्टेंबर रोजी चेपॉकमधील विश्वासणाऱ्यांची प्रार्थना सभा आशीर्वादीत झाल्या बद्दल.

**०१ डिसेंबर** : आमच्या सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादीत केल्याबद्दल.

**०२ डिसेंबर** : आमच्या सर्व सह-संपादक आणि त्यांच्या सहकाऱ्याबद्दल

**०३ डिसेंबर** : शुभवर्तमान न पोंहचलेल्या गटांमध्ये ती पोंहचविण्याऱ्या आमच्या मुख्य मंडळी आणि शाखा मंडळ्यांच्या सेवे बद्दल आणि रविवारच्या उपासनां बद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ डिसेंबर** : सर्व राष्ट्रांत ऐक्य आणि शांति असावी.

**०५ डिसेंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेज सर्व स्टाफ** आणि विद्यार्थ्यांकरिता.

**०६ डिसेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** मासिकाचे सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियाकरिता.

**०७ डिसेंबर** : आमच्या कार्यालयात कामाच्या तासात सर्व स्टाफ आणि प्रिंटर्स यांना सुदृढ आणि सुरक्षित ठेवित असल्याबद्दल.

**०८ डिसेंबर** : आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजा**तील निवासी विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य दिल्याबद्दल.

**०९ डिसेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** मासिक सिंधी, कोंकणी आणि मणीपुरी भाषेत प्रसिद्ध करण्यासाठी

**१० डिसेंबर** : संस्थेकरिता योग्य कर्मचाऱ्यांची निवड करण्याकरिता.

**११ डिसेंबर** : तरुणांमधील आत्महत्येची भावना नष्ट व्हावी.

**१२ डिसेंबर** : मुख्य ,ाणि शाखा मंडळ्यांतील सभासदांच्या कल्याणाकरिता.

**१३ डिसेंबर** : देवाने या महिन्यातील आमच्या सर्व गरजा पुरवाव्यात.

**१४ डिसेंबर** : एको ऑफ हिज कॉलच्या आमच्या सर्व राज्य समन्वयकांकरिता आणि सेवेतील सर्व कार्यक्रमात सहकार्य करण्याकरिता.

**१५ डिसेंबर** : आमच्या सेवाकार्याच्या विस्ताराकरिता आणि जगभरात सुवार्ता गाजविण्यासाठी.

**१६ डिसेंबर** : जगभरातील सर्व स्त्रिया अणि लेकरांच्या सुरक्षितते करिता.

**१७ डिसेंबर** : वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र यशस्वी रित्या लिहिता यावे.

**१८ डिसेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून दैवी रक्षण व्हावे.

(...पान ४ वरुन)

येतो. आपण निश्चितपणे हा आशीर्वाद प्राप्त केला पाहिजे. या आशीर्वादाचा उपयोग आपण आपल्या लोकांकरिता, लेकरांकरिता, आपल्या कुटुंबाकरिता आणि त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी करु शकतो. केवळ स्वर्गीय आशीर्वाद पुरेसा आहे, अशा विचारामुळे, अनेक लोक पृथ्वीचे आशीर्वाद अमान्य करुन देवाने त्यांना दिलेले मोहून टाकतात आणि दु:खात जीवन जगतात.

ईयोबाने त्याचे सर्व आशीर्वाद केवळ एका दिवसात गमाविले. त्याने ७००० मेंढरे, ३००० ऊंट, बैलांच्या ५०० जोड्या व पाचशे गाढवे, त्याचे पुत्र, कन्या आणि नोकर त्याच दिवशी गमविले. ईयोबाला ठाऊक होते कि प्रभु परमेश्वर त्याचा कदापी त्याग करणार नाही. सैताना द्वारे देव केलेल्या संकटामुळे जरी आपल्याला पृथ्वीचे आशीर्वाद गमवावे लागले, तरी देव आपणांस ते सर्व पुन: दुप्पट देण्यास समर्थ आहे. "**...मी पितळेचे दरवाजांचे फोडून तुकडे करीन, लोखंडाचे अडसर मोडून टाकीन. तुला अंधारातील निधि व गुप्त स्थळी लपविलेले धन देईन,... तुला तुझ्या नांवाने हाक मारणारा मी परमेश्वर आहे हे तूं समजशील.**" (यशया ४५:२-४)

"**परमेश्वराने मोशाला सांगितले, पहिल्या पाट्यांसारख्या दोन दगडी पाट्या घडून तयार कर म्हणजे तूं फोडून टाकिलेल्या पहिल्या पाट्यांवर जी वचने होती ती मी त्यांवर लिहीन.**" (निर्गम ३४:१).

जर तुम्ही देवाचे अभिवचन किंवा पृथ्वीचे आशीर्वाद मोडले असतील. तर कृपया समजुन घ्या की देव ते सर्व तुम्हांस पुन: देण्यास तयार आहे. विश्वासाने कृति करा. देव निश्चितच तुमच्या सर्व गरजा पुरविल.

## ३) स्तनाचे आशीर्वाद !

स्तनांचे आशीर्वाद लेकरे प्रस्तुतिवाल्या स्त्रीचे दर्शक आहे. योसेफाने स्तनाचे आणि उदराचे आशीर्वाद मिळविले. १



राजे ४:८ या वचनात आपण शुनम स्त्री बद्दल वाचतो जीचा सर्व आदर करीत असत. तिला देवाच्या सेवकांची सेवा करण्याची सवय होती. तीने एक बरची माडी देवाच्या सेवकास रहावयास केली. ती त्यांच्या सर्व गरजा भागवित असे, **... तूं आमची निगा करण्यात एवढी तत्परता दाखविली, तुझ्या प्रित्यर्थ मी काय करावें?...** (२ राजे ४:१३) असे अलीशाने विचारीले. यावरुन आपल्याला कळते कि तीने देवाच्या सेवकाची योग्य प्रकारे काळजी घेतली - निगा राखली. **येशू त्याच्या शिष्यांस म्हणाला,** "**तुम्ही ख्रिस्ताचे म्हणून जो कोणी तुम्हांस पाण्याचा प्याला प्यावयास देईल तो आपल्या प्रतिफळाला मुकणार नाही हे मी तुम्हांला खचीत सांगतो.**" (मार्क ९:४१) देवाच्या सेवकाला काय सेवा देता याला स्वर्ग मान्यता देतो. देवाचे सेवक कोण आहेत? ते तुमच्या जीव आणि आत्म्याच्या सुस्थितीकरिता आटोकाट प्रयत्न करितात. तुम्ही तुमच्या जीवनात यशस्वी व्हावे यासाठी ते प्रार्थना करितात. ते तुमच्या विषयी स्वर्गातील देवाला सांगतात. "**परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. मला कांही उणे पडणार नाही.**" (स्तोत्र २३:१) मेंढपाळाच्या हातातील आकडीची मेंढरांना कोवळी पाने खाता यावीत याकरिता ती झाडावरुन खाली पाडण्यास उपयोग होतो. जमीनीवरील हिरवे गवत संपुष्टात आल्यावर मेंढपाळ झाडावरील कोवळी पाने काढण्यास आंकडीचा उपयोग करितात. हा स्तनाचा आशीर्वाद आई स्तनांद्वारे लेकराला दूध पाजते, तद्वतच देवाचे सेवक देवाचे आशीर्वाद लोकांपर्यंत पोंहचवितात. अशाप्रकारे आपण ते स्तनांचे आशीर्वादित आशीर्वाद देवाच्या सेवकांपासून प्राप्त केले पाहिजेत. "**...पण हन्नेस कांही अपत्य नव्हते.**" (१ शमुवेल १:२) कारण "**परमेश्वराने तिची कूस वंद केली...**" (१ शमुवेल १:६). हे वचन आम्हांस सांगत आहे, की देवाने तीला पुत्र संतान दिला तर ती त्याला आयुष्यभर परमेश्वराचा व्हावा एनदर्श समर्पण करीन.


**नहेम्या बायबल सायं कॉलेज**
**चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई**

**माध्यम : तमिळ**

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

१) '**बाळाचा विचार करणे**' याचा अर्थ **देवाच्या दृष्टिचा स्विकार करणे** केवळ हेच महत्त्वाचे नाहि.

२) **बाळ जन्मास यावे** - याचा अर्थ देवाच्या दृष्टिचा स्विकार केल्या नंतर आपण परिणामावर निश्चित असणे

३) **त्यानंतर लेकराची वाढ करणे** - देवाच्या दृष्टिकोन स्विकारल्या नंतर त्याची वाढ करून अतिशय काळजीपूर्वक तो कृतित उतरविला पाहिजे.

देवाचे सेवक ज्या काहि स्त्रीया आपल्या नूतन जन्मलेल्या बाळाला कचऱ्याच्या डब्यात टाकून देतात, त्यांच्याप्रमाणे नसावेत. शुभ वर्तमान संदेश देण्याद्वारे आपण इतरांमध्ये देवाचा दृष्टिकोन तयार करू शकतो. परंतु त्यांनी तो प्राप्त केल्या बरोबर किंवा स्विकारल्या बरोबर, आपण त्यांना एकटे सोडू शकत नाहि. आपण त्या जीवांची आत्म्यात, वचनात आणि सत्यात वाढ केली पाहिजे. उत्पति २१.८ आपणास पहावयास मिळते आब्राहामाचा बाळ मोठा झाला तेव्हा त्याची थानमोड केली. थानमोड झाल्यानंतर आब्राहामानें मोठी मेजवानी दिली. मंडळीत व्यक्तिने देवाचा दृष्टिकोन प्राप्त झाल्यानंतर देवाच्या सेवकानें त्यांनी आत्मिक सत्य स्विकारण्यासाठी आणि त्यामध्ये वाढण्या करित त्यांचे मार्गदर्शन करावे ज्या प्रमाणे आई तिच्या लेकरांनी वाढावे यासाठी त्यांना दूध पाजते, ज्या देवाच्या सेवकांनी स्तनाचे आशीर्वाद प्राप्त केले आहेत; त्यांनी पवित्र आत्माच्या सामर्थ्यात उभे राहून मंडळीला आणि लोकांना ते देऊन त्यांना वाढण्यास मदत करावी. देवाची मंडळी मजबूत रचली गेली पाहिजे. "**...तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वारांचे चालणार नाही.**" (मत्तय १६:१८). देवाचे लोक देवाच्या मंडळीत रोपलेले असावेत. "**जे परमेश्वराच्या मंदिरात रोपलेले असतात ते आपल्या देवाच्या अंगणात समृद्ध होतील.**" (स्तोत्र ९२:१३)

## ४) गर्भशयाचे आशीर्वाद !

"**अलीशा घरांत आला तेव्हां मूल मरून आपल्या खाटेवर पडले आहे त्याने पाहिले. मग त्यानें एकट्यानें आंत जाऊन दार लावून घेतले व परमेश्वराची प्रार्थना केली, साडीवर जाऊन त्या मुलावर पडून त्यानें आपले तोंड त्याच्या तोंडाला, आपले डोळे त्याच्या डोळ्यांना, आपले हात त्याच्या हातांना लाविले; त्याच्यावर त्यानें पाखरं घातली तेव्हा मुलाच्या देहास ऊब आली. मग त्याला सोडून तो घरात इकडेतिकडे फिरुं, लागला; व पुन: वर चढून त्या मुलावर त्यानं पाखर घातली तेव्हां मुलानें सात वेळा शिंकून डोळे उघडिले.**" (२ राजे ४:३२-३५)

हा आशीर्वाद देखील लोकांना देवाच्या सेवकाच्या द्वारे प्राप्त होतो. ज्याप्रमाणे आई वेदनाने बाळाला जन्म देते, तद्वतच देवाचा सेवक देवाचे सामर्थ्य प्राप्त करतो आणि लोकांना शुभवर्तमान संदेश देऊन कार्यान्वित करितो, त्यांना वाढण्यास मदत करतो आणि त्याद्वारे आणखीन मंडळ्या स्थापन करितो त्यामध्ये देवाच्या सेवकाची भूमिका महत्त्वाची असते; त्यांना देवापासून जी काहि आशा प्राप्त होते. ती न चुकता लोकापर्यंत आणि मंडळपर्यंत पोहचवून तीचे पालन केले पाहिजे. त्यांनी देवी आज्ञाचे रक्षण देखील केले पाहिजे.

आपल्याला देवाची सेवा करण्यासाठी त्याचे पाचारण होते तेव्हां आपण ते स्विकारावे, माघार घेऊ नये. येशू ख्रिस्ताचा शिष्य थोमा, त्याला भारतीय संस्कृती किंा भाषा ठाऊक नसाताना देखील, स्वत:हून भारतात आला. त्याच्या विश्वासाच्या द्वारे तो देवाचे सामर्थ्य प्रकट झाले. थव्या-थव्यांनी लोकांनी पश्चाताप केला. ३० लाख लोकांनी पश्चाताप केला अशी नोंद करण्यात आली आहे. त्याच्या पैकी देवाच्या कृपेने ७ लाख लोक देवाच्या सेवेत आहेत. या लोकांनी जर योग्य पद्धतीने कार्य केले तर कि, किती लोक पश्चाताप करुन

(पुढील पान ९ वर)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## कर सवलत

*to donations received for Educational and Medical Aid for under-privileged*

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## देव पुरेसा आहे GOD IS SUFFICIENT!

''... **परमेश्वराला शरण जाणाऱ्यांस कोणत्याहि चांगल्या वस्तूंची वाण पडत नाही.**'' (स्तोत्र ३४:१०)

आम्ही १९६९ साली, जेव्हा **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याची सुरवात केली. आम्हाला आमच्या बहुविविध कार्यासाठी निधीची गरज होती. काम करणाऱ्यांच्या पगारासाठी, छपाईचा कागद, टपाल तिकीट, दूरध्वनिचे बिल, विद्युत बिल, इमारतीचे भाडे, वाहन, धर्मदाय इत्यादि साठी पैशांची गरज होती.

स्वत:विषयी बोलावयाचे झाल्यास माझा प्रभु येशू ख्रिस्त मजकरिता पुरेसा होता. मी पैशांची मागणी करण्यासाठी आजपर्यंत कोणाचेहि दार ठोठावले नाहि किंवा कोणत्याहि कार्यालयात गेलो नाही. मला माझ्या मंडळीतील सभासदांकडे किंवा मित्रांकडे देखील पैशांची मागणी करण्याची सवय नाही. तरी आज पर्यंत, ज्या प्रभुने मला पाचारण केले; तो माझी गरज अगदी वेळेवर, त्याच्या मार्गाने अगदी चमत्कारीक रित्या पुरवित आहे.

''**आपआपल्या समयी होणारी हरएक वस्तु, त्यानें सुंदर बनविली आहे...**'' (उपदेशक ३:११)

गरजांच्या आणि कठीण समयात, मी परिस्थितीकडे ''हि माझी सहन करण्याची वेळ आहे, मला प्रार्थना करण्यास देव भाग पाडीत आहे. अशी हि वेळ आहे, आणि प्रार्थनेत अधीक उत्तम नाते जोडण्याची वेळ आहे अशा विचारांनी पहाण्याची सवय लावून घेतली आहे. अशा प्रकारे सराव केल्यामुळे मला मोठ मोठे चमत्कार अनुभवण्यास मिळाले. अशा परिस्थितीत, देवाने मला मदत करण्यासाठी अनोळखी लोकांना तयार केले. अनेक वेळेस देवाने अनोळखी लोकांच्या द्वारे आणि माझ्या कुटुंबाला अन्न दिले!

१९७५ साली, आमचे **एको ऑफ हिज कॉल** मासिक ज्या बापूजी छापखान्यात छापण्यात येत होते त्यांना ३०० रुपये (भारतीय चलन) द्यावयाचे होते. मजकडे पैसे नसल्यामुळे पैसे देण्यास विलंब लागला होता. एका गुरुवारच्या दिवशी मी त्या छापखान्याच्या मॅनेजरला पुढील सोमवारी पैसे देण्याचे कबूल केले. परंतु ते पैसे मला मिळण्याचा कोणताहि मार्ग मजकडे नव्हता. मी पैसे वेळेवर देवू शकलो नाही तर त्या महिन्याचा अंक मला प्रसिद्ध करणे शक्य होणार नव्हते; त्याशिवाय सरकार द्वारे होणाऱ्या पुष्कळश्या समस्यांना सामोरे जावे लागणार, याची मला चिंता-काळजी वाटू लागली. मी माझी हि गरज देवाकडे मांडली आणि शांत राहिलो. रविवार पर्यंत माझ्याकडे आवश्यक असलेली रक्कम आली नाहि.

सोमवारी सकाळी, पोस्टातील माझी टपाल पेटी उघडली, तर त्यांत मला दक्षिण भारतातील मदुराई आणि टुटीकोरीन या दोन शहरांच्या मध्यभागी असलेल्या नागालपुरम या छोट्याशा खेड्यांतून पाठविण्यात आलेल पाकीट सापडले. त्यांत ३०० रुपयांचा बँक डिमांड ड्राफ्ट (पैसे काढता येऊ शकणारा) होता. ते पैसे माझ्या त्या दिवसाच्या गरजे पुरते पुरेसे होते. मला वचन दिल्यानुसार त्या छापखान्याला पैसे चुकते करता अले. प्रभुचा गौरव असो!

अनेक वर्षाच्या नंतर मी नागालपुरम येथे त्या व्यक्तिला भेटण्यासाठी गेलो. ती व्यक्ति चांभार होती; हे पाहून मी अचंबीत झालो.



मला पाहून त्याला खूप आनंद झाला. तो म्हणाला, ''महाशय, त्या विशिष्ठ गुरुवारी, कोणी तरी माझ्या अंत:करणाशी बोलत असल्याचे मला जाणवले, तो मला माझ्या जवळ केवळ जे ३०० रुपये होते, ते **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याकरिता मी पाठवावे म्हणून मनवळवित होता. त्यामुळे मी शुक्रवारी ते पैसे पाठविले जे तुम्हाला सोमवारी मिळाले.''

अशा रितीने प्रभु येशू ख्रिस्त माझ्या जीवनात चमत्कार घडवितो. आमच्याकडे जरी कायमस्वरूपी आर्थीक आधार उपलब्ध नाही तरी प्रभु येशू अशा अनोळखी लोकांच्या द्वारे आमच्या गरजा पुरवितो.

तरी देखील हा खडतर - कठीण असा मार्ग आहे! अशाहि स्थितीत मी देवाच्या महान गौरवाची साक्ष प्रत्येक देऊ शकत आहे. ''**परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. मला कांहि उणे पडणार नाहि.**'' (स्तोत्र २३:१).

''**जो कोणी बुद्धिमान् असेल त्यानें ह्या गोष्टींकडे लक्ष पुरवावे...**'' (स्तोत्र १०७:४३)

* * * * * * * * * * *

पान ७ वरुन

देवाची लेकरें बनू शकतील याची आपण कल्पना करु शकतो. हे साध्य करण्यास, आपल्याला गर्भाशयाच्या आशीर्वादाची गरज आहे. जशी एक माता वेदना देऊन बाळाला जन्म देते. आपण आपल्याला झालेल्या पाचारणास प्रामाणिक आणि समर्पित असलो तर लोकांना पश्चातापास प्रवृत्त करु शकतो.

२ राजे ४:१८ हे वचन एक मुलाविषयी सांगते, तो शेतात कापणी असलेल्या त्याच्या बापाकडे गेला. हा मुलगा मोठा होऊन बापाला मदत करु शकेल. तद्वतच, मंडळी किंवा देवाचे सेवक, किंवा मंडळीतील सभासदांची वाढ होते, तेव्हा त्यांनी देखील इतरांना मदत करावी. ''**तो आपल्या बापास म्हणाला, अरेरे! माझे डोके! माझे डोके! त्याने आपल्या चाकरांस सांगितले, यास त्याच्या आईकडे उचलून ने.**'' (२ राजे ४:१९) मुलगा जसा आजारी पडला, तशीच समस्या देवाच्या सेवकांना आणि विश्वासणाऱ्यांना त्यांच्या प्रार्थनेच्या जीवनात, सेवेत किंवा उपासनेला हजर रहाण्यात येऊ शकते. अशा समस्येकडे आपण दुर्लक्ष करु नये. या घटनेत तसे घडले. मुलगा आईच्या मांडिवर मृत्यु पावला. आपल्या सेवेत किंवा आत्मिक प्रयत्नात जर आपल्याला आत्मिक मृत्युला सामोरे जावे लागले तर आपण मंडळीत जावे व आपल्या प्रभु परमेश्वराकडे यावे. आईच केवळ बाळाला वाचवू शकते. आपण मंडळीत जेव्हा जातो, प्रभु जो आपली आई आहे; निश्चितच आपला बचाव करील. जे मृत आहेत ते देवाला काही करु शकत नाही आणि त्यासाठी चमकू देखील शकत नाही.

येहेज्केल ४७:३-५ या वचनात आपण वाचतो कि पाण्यांतून चालण्यास एक हजार हात अंतर मोजण्यात आले. तेथे पाणी घोट्या पर्यंत होते. त्यानंतर आणखी हजार हात अंतर मोजण्यात आले, तेथे पाणी घुडघ्यापर्यंत होते. नंतर आणखी हजार हात अंतर मापले गेले, तेथे पाणी कमरेपर्यंत होते. त्यानंतर आणखी हजार हात मोजले गेले, तेथे पाणी नदीसारखे होते आणि त्या पाण्यातून संदेष्ट्याला चालता येईना देवानें थोड्या-थोड्या अंतराने आपणास का मोजणी केली? त्याचे कारण असे, कि देव जे अंतर कापण्यास चालण्यास देतो, ते जर योग्य प्रकारे चालतो, तेव्हा पुढील आशीर्वाद मोजून आपल्याला दिले जातात. अशा रितीने येथे देव आपणास असे प्रकट करीत आहे. कि देवाने दिलेलेल्याचा योग्य प्रकारे उपयोग केल्यास पुढील आशीर्वाद प्राप्त होतात. आपण आपल्या मंडळीकडे किंवा सेवेकडे योग्यप्रकारे लक्ष देतो तेंव्हा देवाचे विपुल आशीर्वाद प्राप्त होतात आणि त्यात फार मोठ्या-प्रमाणात वाढ दिसून येते.

गणना १६:३६-३८ या वचनांत आपण असे वाचतो, ''**परमेश्वर मोशाला म्हणाला, अहरोन याजकाचा पुत्र एलाजार मा सांग की धुपाटणी अग्नीतून काढ व तो अग्नि विखरुन टाक, कारण ती पवित्र आहेत, पाप करुन आपल्या जिवास मुकले त्यांची ती धुपाटणी घेऊन त्यांचे पत्रे ठोकून वेदी मढीव, कारण त्यांनी परमेश्वराला समर्पण केल्यामुळे पवित्र आहेत इस्त्राएल लोकांस सांग की चिन्हादाखल होतील.**''

पेटी, दीपस्तंभ आणि वेदी ही निवासमंडपात त्याच ठिकाणी राहतील. परंतु धुपाटणी याजकाच्या हातात राहतील आणि तो जेथे कोठे जाईल ती त्याजबरोबर जातील. आता धुपाटणी नको त्या जागी अडकून राहिली. धुपाटणी पवित्र स्थानात यावयास हवी होती; परंतु येथे ती बाहेरील अंगणात होती. देवाने आज्ञा दिली होती की, धुपाटणी ठोकून त्याच्या पत्र्यानें वेदी झांकावी. आपणाला याची जाणीव झाली पाहिजे कि आपली आत्मिक वाढ स्वर्गा पर्यंत पोंहचविण्यास हवी ती मध्येच थांबू नये. आपण आपणास प्राप्त झालेल्या एका विशिष्ट आत्मिक अनुभवामुळे संतुष्ट असु नये किंवा त्यात - समाधान मानू नये. तर आत्मिक आत्मिकतेत सतत वाढत राहून देवाची सेवा करीत रहावी, जेणे करून त्याच्या राज्यात आपल्याला प्रवेश करिता येईल.

२ राजे ४:२१-३५ या वचनात आपणास पहावयास मिळते, की मृत मुलाला जीवंत उठविण्यासाठी, गाढव, नोकर, आई, देवाचा सेवक आणि त्याच्या सहाय्यकाने त्यांच्या परिने पुष्कळ प्रयत्न केले. ह्या पांच जण्यांची तुलना पांच सुवर्तिकां प्रेषित, संदेष्टे, पास्टरस् आणि शिक्षक यांच्याशी करता येईल. हे पांच प्रमुखजन जे आपल्याला गर्भाशयाचा (उदराचा) आशीर्वाद देवू शकतील. देवाचा माणूस अलीशाकडे जाण्यासाठी तीन जनांचा उपयोग करण्यात आला. चवथा गेहजी, जो अलीशाचा सहाय्यक होता, त्याने अलीशाच्या काठीच्या द्वारे मृत मुलाला जीवंत करण्याचा प्रयत्न केला. त्याला अपयश आल्यामुळे, त्यांनी मुलाला अलीशाकडे आणिले.

''**अलीशा घरांत आला तेव्हां मूल मरून आपल्या खाटेवर पडले आहे असे त्याने पाहिले. मग त्याने एकट्याने आंत जाऊन दार लावून घेतले व परमेश्वराची प्रार्थना केली. गाडीवर जाऊन त्या मुलावर पडून त्याने आपले तोंड, त्याच्या तोंडाला, आपले डोळे, त्याच्या डोळ्यांना, आपले हात त्याच्या हातांना लाविले; त्याच्यावर त्याने पाखर घातली तेव्हा मुलाच्या देहास ऊब आली. मग त्याला सोडून तो घरात इकडेतिकडे फिरु लागला; व पुन: वर चढून त्या मुलावर त्यानें पाखर घातली तेव्हा मुलाने सात वेळा शिंकून डोळे उघडिले.** (२ राजे ४:३२-३५)

त्या मुलाला जीवंत करण्याकरिता, अलीशाला वेगवेगळी पद्धत वापरावी लागली, इकते-तिकडे फिरावे लागले, आणि सरते शेवटि त्या मुलाला जीवंत केले. त्याच्या प्रयत्नांची तुलना बाळाला भयंकर वेदना आणि प्रयत्नाद्वारे जन्म देणाऱ्या आईशी करु शकतो.

तद्वतच, देवाच्या सेवकाला बाळाला जन्म देणाऱ्या मातेसारखी वेदना सहन कराव्या लागतात. लोकांचे आत्मिक जीवन नाश पावणार नाही यासाठी त्यांनी धडपड केली पाहिजे.

मूलाच्या श्वसन यंत्रणा बंद करणारी मुलगा जेव्हा सात वेळा शिंकल्यामुळे ती बाहेर पडली. देवाच्या सेवकाने देखील त्याच्या लोकांना आशीर्वाद मिळवित यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करण्यात कमी पडू नयेत.

***********

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल
### एक चांगली संधी
### मासिक मोफत मिळवण्यासाठी

जर तुमच्या मित्र/नातेवाईकांना पत्ता पोस्टाने, पत्राने, इमेलने, वॉटस्अपने किंवा फोन द्वारा आम्हाला पाठविला, तर एको ओफ हिज कॉल मासिक त्यांनी मोफत पाठवुं.

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/- आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th NOVEMBER 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**